Epaper
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। सोमवार, दि. 7 सप्टेंबर २०२६ । वर्ष १ ।अंक १४९ ।पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION



कृषिसेवा केंद्रांना दणका; नियमभंग करणाऱ्या १३ केंद्रांचे परवाने निलंबित

(पान २ वर)

» Selected

### पुढील सात दिवसांत पावसाचा जोर वाढणार?

मुंबई : ऑगस्ट महिन्यात राज्यातील अनेक भागांत अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली होती. काही भागांत पावसाच्या खंडामुळे पिकांवर परिणाम झाला, तर काही ठिकाणी शेतीचे नुकसान झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. आता मात्र राज्यात पुन्हा पावसाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता असून, पुढील काही दिवसांत विविध भागांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील काही दिवस राज्याच्या पश्चिम भागातील कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे काही भागांत उकाडा जाणवण्याची शक्यता असली तरी कोकण-गोवा परिसरात पावसाची स्थिती कायम राहणार आहे. या भागातील अनेक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे

## गिरीश महाजन येताच रक्षा खडसेंचा बैठकीतून वॉकआऊट, जळगावातील भाजपच्या जिल्हा बैठकीत घडामोड

# भाजपमधील अंतर्गतवाद चव्हाट्यावर?

### दिल्लीतील महत्त्वाच्या बैठकीसाठी एक तास आधीच बाहेर पडल्या' महाजनांचा खुलासा

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । जळगाव जिल्ह्यातील भाजपच्या राजकारणात पुन्हा एकदा अंतर्गत मतभेदांच्या चर्चेला उधाण आले आहे. जळगावमध्ये आयोजित भाजपच्या जिल्हा बैठकीत मंत्री गिरीश महाजन दाखल होताच केंद्रीय मंत्री रक्षा खडसे बैठकीतून बाहेर पडल्याची घटना समोर आली आहे. या घडामोडीमुळे भाजपमधील अंतर्गत राजकारण पुन्हा चर्चेत आले असले, तरी गिरीश महाजन यांनी पक्षात कोणताही अंतर्गत वाद नसल्याचे स्पष्ट केले आहे.**

जळगावमध्ये भाजपच्या जिल्हा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, मंत्री गिरीश महाजन बैठकीत दाखल झाल्यानंतर काही वेळातच केंद्रीय मंत्री रक्षा खडसे बैठकीतून बाहेर पडल्या. त्यामुळे राजकीय वर्तुळात या घटनेची चर्चा सुरू झाली. रक्षा खडसे यांच्या बैठकीतून बाहेर पडण्याचा आणि महाजन यांच्या बैठकीत दाखल होण्याचा वेळ एकाच वेळी आल्याने या घटनेकडे राजकीय दृष्टिकोनातून पाहिले जात आहे. यामुळे भाजपमधील कथित अंतर्गत मतभेद पुन्हा चव्हाट्यावर आल्याची चर्चा सुरू झाली आहे.



या संपूर्ण प्रकारावर गिरीश महाजन यांनी स्पष्टीकरण दिले आहे. रक्षा खडसे यांची उद्या दिल्लीमध्ये महत्त्वाची बैठक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठी त्यांना दिल्लीला रवाना व्हायचे असून, त्यांचे विमान सायंकाळी सात वाजता असल्याने त्या बैठकीतून सुमारे एक तास आधीच बाहेर पडल्या, असे महाजन यांनी स्पष्ट केले. रक्षा खडसे यांनी बैठकीतून बाहेर पडण्याबाबत आपल्याला माहिती दिली होती, असेही महाजन यांनी सांगितले. त्यामुळे त्यांच्या बैठकीतून बाहेर पडण्याचा पक्षातील कोणत्याही वादाशी संबंध जोडू नये, असा संदेश महाजन यांच्या स्पष्टीकरणातून देण्यात आला. भाजपमध्ये कोणताही अंतर्गत वाद नसल्याचे गिरीश महाजन यांनी ठामपणे सांगितले. 'पक्षामध्ये कोणताही वाद नाही. त्यांच्या घरचा कोणता विषय असेल, तो वेगळा विषय आहे,' असे महाजन यांनी स्पष्ट केले. मात्र, जळगाव भाजपच्या राजकारणात यापूर्वीही खडसे-महाजन यांच्यातील राजकीय समीकरणावरून विविध चर्चा होत आल्या आहेत. त्यामुळे आजच्या बैठकीतील घडामोडीने या चर्चांना पुन्हा हवा मिळाली आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विरोधी पक्षातील अनेक प्रमुख नेते उपस्थित होते. मात्र, निमंत्रण असूनही भाजपच्या प्रमुख नेत्यांपैकी कोणीही उपस्थित न राहिल्याची चर्चा झाली होती.

#### आजच्या घटनेने चर्चेला पुन्हा उधाण

या पार्श्वभूमीवर आज भाजपच्या जिल्हा बैठकीत घडलेली घटना महत्त्वाची मानली जात आहे. गिरीश महाजन बैठकीत दाखल झाल्यानंतर रक्षा खडसे बाहेर पडल्याने पक्षातील कथित मतभेदांच्या चर्चांना पुन्हा बळ मिळाले आहे. मात्र, रक्षा खडसे यांच्या दिल्ली दौऱ्याचे नियोजन आणि विमानाची वेळ यामुळे त्या बैठकीतून लवकर बाहेर पडल्याचा दावा गिरीश महाजन यांनी केला आहे. त्यामुळे जळगाव भाजपमध्ये प्रत्यक्षात कोणताही अंतर्गत संघर्ष आहे का, की आजची घटना केवळ योगायोग होता, याबाबत राजकीय वर्तुळात तर्क-वितर्क सुरू झाले आहेत. आगामी काळात या विषयावर संबंधित नेत्यांकडून आणखी काही प्रतिक्रिया येतात का, याकडे लक्ष लागले आहे.

## राज ठाकरेंकडून मोदींना पाहून भारावलेल्या NRI महिलेची मिमिक्री, 'इतकंच वाटतंय तर देशात राहायला या'

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारताचा आर्थिक विकास दर (GDP) 7.8 टक्के असून तो चीन व अमेरिका यांच्यापेक्षाही जास्त असल्याचा दावा करतात. मग ते भारतीयांना सोने (Gold) खरेदी करु नका किंवा परदेशात फिरायला जाऊ नका, असे का सांगतात, असा सवाल मनसेप्रमुख राज ठाकरे (Raj Thackeray) यांनी उपस्थित केला. ते रविवारी ठाण्यात आयोजित करण्यात आलेल्या मनसे कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलत होते. यावेळी राज ठाकरे यांनी पंतप्रधान मोदी आणि भाजपवर सडकून टीका केली.राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात परदेशात राहणाऱ्या भारतीयांवरही टीकास्त्र सोडले. यावेळी राज यांनी मोदींना भेटायला आलेल्या एका महिलेची मिमिक्री केली. आमचे पंतप्रधान ज्यावेळी नरेंद्र मोदी परदेशी जातात त्यावेळी तिकडे त्या बायका येतात ना गर्दीत..."मोदीजी को देखा ऐसा लगा भगवान को ही मिले", असे एक महिला म्हणत होती. एवढं जर वाटतंय ना तुम्हाला, मग या ना परत देशात. जर या देशात सगळं छान व्यवस्थित सुरु आहे, 7.8 टक्के जीडीपी आहे, इतर देशांपेक्षा जास्त विकासदर आहे, मग तुम्ही परदेशात राहताय कशाला, या इकडे, असा टोला राज ठाकरे यांनी अनिवासी भारतीयांना लगावला. राज ठाकरे यांनी आपल्या भाषणातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासदराविषयी केलेला दावा खोडून काढला. दोन दिवसांपूर्वी नरेंद्र मोदींनी परदेशात असताना सांगितले की, कोणीही परदेशात जाऊ नका. मला ही गोष्टच फार आवडली की, परदेशातून भारतीयांना सांगायचे परदेशात जाऊ नका. सोने खरेदी करू नका आणि भारतात सांगितले जात आहे की, आमचा देशाचा जीडीपी 7.8



टक्के आहे. जो अमेरिका आणि चीनपेक्षा देखील जास्त आहे. मग परदेशात का जायचे नाही? मग सोने का खरेदी करायचे नाही? घरामध्ये जेव्हा चणचण असते, तेव्हाच काटकसर सुरू होते ना. 7.8 टक्के आपला जीडीपी ग्रोथ आहे, मग या देशातल्या लोकांनी परदेशात का फिरायला जायचे नाही? त्यांनी का सोने खरेदी करायचे नाही? याचे कारण संपूर्ण देशाची आर्थिक परिस्थिती ही ढासळलेली आहे, अशी टीका राज ठाकरे यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारताचा आर्थिक विकास दर (GDP) 7.8 टक्के असून तो चीन व अमेरिका यांच्यापेक्षाही जास्त असल्याचा दावा करतात. मग ते भारतीयांना सोने (Gold) खरेदी करु नका किंवा परदेशात फिरायला जाऊ नका, असे का सांगतात, असा सवाल मनसेप्रमुख राज ठाकरे (Raj Thackeray) यांनी उपस्थित केला. ते रविवारी ठाण्यात आयोजित करण्यात आलेल्या मनसे कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलत होते. यावेळी राज ठाकरे यांनी पंतप्रधान मोदी आणि भाजपवर सडकून टीका केली.राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात परदेशात राहणाऱ्या भारतीयांवरही टीकास्त्र सोडले. यावेळी राज यांनी मोदींना भेटायला आलेल्या एका महिलेची मिमिक्री केली. आमचे पंतप्रधान ज्यावेळी नरेंद्र मोदी परदेशी जातात त्यावेळी तिकडे त्या बायका येतात ना गर्दीत..."मोदीजी को देखा ऐसा लगा भगवान को ही मिले", असे एक महिला म्हणत होती. एवढं जर वाटतंय ना तुम्हाला, मग या ना परत देशात. जर या देशात सगळं छान व्यवस्थित सुरु आहे, 7.8 टक्के जीडीपी आहे, इतर देशांपेक्षा जास्त विकासदर आहे, मग तुम्ही परदेशात राहताय कशाला, या इकडे, असा टोला राज ठाकरे यांनी अनिवासी भारतीयांना लगावला. राज ठाकरे यांनी आपल्या भाषणातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासदराविषयी केलेला दावा खोडून काढला. दोन दिवसांपूर्वी नरेंद्र मोदींनी परदेशात असताना सांगितले की, कोणीही परदेशात जाऊ नका.

## भिमाशंकरमध्ये VIP वाहनांमुळे वाहतूक कोंडी; अरुंद रस्त्यात पोलिसांची कसरत

जन सम्राट टाईम्स

**भिमाशंकर।** भिमाशंकर येथे भाविकांची मोठी गर्दी असतानाच VIP तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या वाहनांची भर पडल्याने वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

मंदिर परिसराकडे जाणाऱ्या अरुंद रस्त्याच्या कडेलाच काही वाहनांचे पार्किंग करण्यात आल्याने भाविकांच्या वाहनांना मार्ग काढताना अडथळे निर्माण झाले. परिणामी रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली असून ती सुरळीत करण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागत आहे. भिमाशंकर मंदिरात दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक दाखल होत असल्याने परिसरातील रस्त्यांवर वाहनांची संख्या वाढली आहे. अशा परिस्थितीत रस्त्याच्या कडेला VIP आणि प्रशासकीय वाहनांचे पार्किंग झाल्याने उपलब्ध रस्ता आणखी अरुंद झाला.

मंदिराजवळच वाहनांची गर्दी VIP तसेच प्रशासकीय अधिकारी मंदिरात दर्शनासाठी गेल्याने त्यांची वाहने मंदिराच्या जवळच उभी करण्यात आल्याचे दिसून आले. भाविकांसाठी असलेल्या वाहनांच्या हालचालींमध्ये या वाहनांमुळे अडथळा निर्माण झाला. वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. पोलिसांची वाहतूक सुरळीत करण्यासाठी धावपळ रस्त्याची रुंदी कमी आणि वाहनांची संख्या अधिक असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर निर्माण झाले. अडकलेल्या वाहनांना मार्ग करून देण्यासाठी पोलिसांना वारंवार हस्तक्षेप करावा लागत आहे. भाविकांची वाहने पुढे सरकविणे, रस्त्याच्या कडेला उभी असलेली वाहने हटविणे आणि दोन्ही बाजूंची वाहतूक नियंत्रित करण्यासाठी पोलिसांची धावपळ सुरू आहे

## तारखेडा शिवारात बिबट्याचा धुमाकूळ; सहा ते सात शेळ्या ठार

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा । प्रतिनिधी:** जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील तारखेडा शिवारात बिबट्याने धुमाकूळ घातल्याची घटना समोर आली आहे. शेतात बांधलेल्या शेळ्यांवर बिबट्याने हल्ला केल्याने सहा ते सात शेळ्यांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी आणि पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. तारखेडा शिवारातील शेतकरी एकनाथ पाटील यांच्या शेतात ही घटना घडली. रात्रीच्या सुमारास बिबट्याने शेतातील शेळ्यांवर हल्ला केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या हल्ल्यात सहा ते सात शेळ्यांचा मृत्यू झाला. सकाळी शेळ्या मृतावस्थेत आढळून आल्यानंतर ही घटना उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. शेळ्यांचा मृत्यू बिबट्याच्या हल्ल्यात झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करून मृत शेळ्यांचा पंचनामा केला आहे. हल्ल्याची नेमकी



परिस्थिती तसेच बिबट्याच्या उपस्थितीबाबत वन विभागाकडून पुढील तपास करण्यात येत आहे. या घटनेमुळे शेतकरी एकनाथ पाटील यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतीसोबत पशुपालनावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकाच वेळी अनेक शेळ्यांचा मृत्यू होणे हा मोठा आर्थिक धक्का आहे. त्यामुळे वन विभागाने नुकसानग्रस्त शेतकऱ्याला शासनाच्या नियमानुसार मदत व नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, तारखेडा परिसरात बिबट्याचा वावर असल्याची चर्चा असून, शेतकरी रात्रीच्या वेळी शेतात जाण्यास घाबरत आहेत. शेतांमध्ये पिकांची कामे, पशुधनाची देखभाल तसेच सिंचनासाठी रात्री-अपरात्री जावे लागणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये विशेष चिंता निर्माण झाली आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## डीजेच्या दणदणाटाविरोधात पुणेकर रस्त्यावर

### 'डीजेबंदी झालीच पाहिजे'च्या घोषणा; पुणेकर मंचाच्या मोर्चाला उत्स्फूर्त प्रतिसाद

जन सम्राट टाईम्स

**पुणे| प्रतिनिधी:** : सार्वजनिक उत्सवांमध्ये होणाऱ्या कर्णकर्कश ध्वनिवर्धक आणि 'डीजे'च्या दणदणाटाविरोधात पुणेकरांचा रोष रविवारी रस्त्यावर उतरल्याचे पाहायला मिळाले. 'सोलापूर, मुंबई आणि नागपूरमध्ये डीजेवर निर्बंध लागू शकतात, तर पुण्यात का नाही?' असा सवाल करत शेकडो नागरिकांनी 'डीजे' आणि ध्वनिवर्धकांच्या भिंतींवर बंदीची मागणी केली. 'डीजेबंदी झालीच पाहिजे', 'शांतता आमचा हक्क आहे', 'आवाज बंद कर डीजे, तुला पुणेकरांची शपथ हाय' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. 'लाउड स्पीकरविरोधी पुणेकर मंच'च्या आवाहनाला प्रतिसाद देत हा मोर्चा काढण्यात आला. जंगली महाराज रस्त्यावरील झाशीची राणी लक्ष्मीबाई चौक ते पुणे महानगरपालिका या मार्गावर नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. सर्व धर्मीय आणि राजकीय उत्सवांमध्ये कर्कश ध्वनिवर्धकांचा वापर बंद करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. बापट यांच्या मागणीला नागरिकांचे बळ सार्वजनिक उत्सवांमध्ये मोठ्या आवाजात वाजणाऱ्या ध्वनिवर्धकांविरोधात आवाज उठविणारे विद्यानंद बापट गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहेत. स्पीकरच्या भिंतींवर बंदी घालावी आणि ढोल-ताशा पथकांचे वादन सर्वोच्च न्यायालयाने ध्वनीप्रदूषणाबाबत निश्चित केलेल्या नियमांच्या मर्यादेत व्हावे, अशी त्यांची भूमिका आहे. याच मागण्यांसाठी बापट यांनी



महापालिकेच्या नागरी सभेतही आवाज उठविला होता. मात्र, त्यांना तेथून बाहेर काढण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर गेल्या आठवड्यात एका वृत्तवाहिनीशी बोलत असताना एका तरुणाने त्यांना मारहाण केल्याची घटना घडली. या घटनेचा निषेधही मोर्चात करण्यात आला. बापट मोर्चाला उपस्थित राहू शकले नसले तरी त्यांच्या 'डीजेबंदी'च्या मागणीला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिल्याचे चित्र रविवारी पाहायला मिळाले. सुरक्षेच्या कारणास्तव मोर्चापासून दूर गेल्या आठवड्यात झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या कारणास्तव विद्यानंद बापट मोर्चात सहभागी झाले नाहीत. मात्र, त्यांच्या अनुपस्थितीतही नागरिकांनी डीजे आणि कर्कश ध्वनिवर्धकांविरोधातील भूमिका आक्रमकपणे मांडली. उत्सव साजरे करण्यास कोणाचाही विरोध नसून, मात्र उत्सवाच्या नावाखाली नागरिकांच्या आरोग्यावर आणि शांततेवर परिणाम करणारा कर्णकर्कश आवाज सहन केला जाणार नाही, अशी भूमिका मोर्चातील सहभागी नागरिकांनी व्यक्त केली. 'सण-उत्सवांसाठी नियमावली हवी' दरम्यान, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही सण-उत्सवांमध्ये डॉल्बी आणि डीजेच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. सण-उत्सव पारंपरिक पद्धतीने साजरे करण्याची गरज व्यक्त करत त्यांनी उत्सवांसाठी स्पष्ट नियमावली असावी, अशी भूमिका मांडली. गोविंदा उत्सवातील मंचांवर होणाऱ्या नृत्याबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केला. महाराष्ट्राने इतर राज्यांतील पद्धतींचे अनुकरण करण्याऐवजी आपल्या पारंपरिक संस्कृतीला प्राधान्य द्यावे, असा सूर त्यांनी व्यक्त केला. राजकीय नेत्यांचाही 'डीजेबंदी'ला सूर विशेष म्हणजे, 'डीजे'च्या दणदणाटाविरोधातील नागरिकांच्या मागणीला सत्ताधारी तसेच विरोधी पक्षातील काही नेत्यांकडूनही समर्थन मिळत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ एखाद्या व्यक्तीच्या विरोधाचा न राहता सार्वजनिक आरोग्य, ध्वनीप्रदूषण आणि उत्सवांतील शिस्तीशी संबंधित व्यापक मुद्दा बनत असल्याचे दिसून येत आहे. आता पुण्यातील नागरिकांच्या या वाढत्या रोषाची प्रशासन आणि महापालिका कशा पद्धतीने दखल घेणार, तसेच आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर ध्वनिवर्धकांच्या वापराबाबत कोणती भूमिका घेतली जाणार, याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

## कव्ह्यात घराच्या मागेच गांजाची लागवड

जन सम्राट टाईम्स

**लातूर| प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यातील कव्हा गावात घराच्या मागील बाजूसच गांजाची अवैध लागवड केल्याचा प्रकार समोर आला आहे. पोलिसांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे कारवाई करत घराच्या मागे लावण्यात आलेली गांजाची झाडे जप्त केली. या कारवाईत तब्बल ६ लाख ८२ हजार रुपये किमतीची गांजाची झाडे पोलिसांच्या हाती लागली आहेत. या प्रकरणी मुक्तार शेख याच्याविरुद्ध अवैधरित्या गांजाची लागवड केल्याप्रकरणी कारवाई करण्यात आली असून त्याला पोलिसांनी अटक केली आहे. घराच्या अगदी मागील बाजूस गांजाची लागवड करण्यात आल्याने या प्रकाराची परिसरात चर्चा सुरू झाली आहे. घराच्या मागील बाजूस लागवड कव्हा गावात घराच्या मागे गांजाची लागवड करण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी संबंधित ठिकाणी धाड टाकून पाहणी केली असता गांजाची झाडे आढळून आली. पोलिसांनी ही झाडे ताब्यात घेतली असून त्यांची किंमत सुमारे ६ लाख ८२ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. संशयिताला अटक अवैध गांजा लागवडीप्रकरणी पोलिसांनी मुक्तार शेख याला अटक केली आहे. गांजाची लागवड करण्यामागील उद्देश तसेच या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याबाबत पोलिसांकडून तपास केला जात आहे. कारवाईमुळे खळबळ घराच्या मागील बाजूसच गांजाची लागवड केल्याचा प्रकार उघडकीस आल्याने कव्हा गावात खळबळ उडाली आहे. अवैध अमली पदार्थांच्या लागवडीविरोधात पोलिसांकडून कारवाई सुरू असून, या प्रकरणाच्या पुढील तपासात आणखी काही बाबी समोर येण्याची शक्यता आहे.

# कृषिसेवा केंद्रांना दणका; नियमभंग करणाऱ्या 13 केंद्रांचे परवाने निलंबित

## नाशिक जिल्ह्यात कृषी विभागाची धडक कारवाई; आतापर्यंत १५४ परवाने निलंबित

जन सम्राट टाईम्स

**नाशिक| प्रतिनिधी :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते व कीटकनाशके उपलब्ध व्हावीत, तसेच कृषी निविष्ठांच्या विक्रीत गैरप्रकार होऊ नयेत, यासाठी नाशिक जिल्हा कृषी विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या जिल्ह्यातील आणखी १३ कृषिसेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा परवाना अधिकारी रवींद्र माने यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली आहे. खरीप हंगामाचे नियोजन सुरू असतानाच कृषी विभागाने जिल्ह्यातील कृषिसेवा केंद्रांची तपासणी मोहीम तीव्र केली आहे. शेतकऱ्यांना बियाणे, खते आणि कीटकनाशकांची विक्री शासनाच्या नियमांनुसार आणि निर्धारित दरात होते की नाही, याची तपासणी करण्यात येत आहे. तपासणीदरम्यान आढळलेल्या अनियमिततेबाबत संबंधित केंद्रांच्या संचालकांना सुनावणीची संधी देण्यात आली. त्यानंतर नियमांचे उल्लंघन सिद्ध झालेल्या केंद्रांवर परवाना निलंबनाची कारवाई करण्यात आली. १५४ परवाने निलंबित शेतकऱ्यांची फसवणूक रोखण्यासाठी ९ एप्रिल २०२६ पासून जिल्ह्यात कारवाई सुरू आहे. आतापर्यंत खते विक्रीशी संबंधित १०८, बियाणे विक्रीशी संबंधित २६ आणि कीटकनाशक विक्रीशी संबंधित २०, असे एकूण १५४ परवाने निलंबित करण्यात आले आहेत.



याशिवाय ५२ परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. उपलब्ध माहितीनुसार, राज्यात सर्वाधिक परवान्यांवर कारवाई करणारा जिल्हा म्हणून नाशिकची नोंद झाली आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने यांनी शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून खरीप हंगामाचे नियोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

कोणत्याही परिस्थितीत निकृष्ट दर्जाच्या कृषी निविष्ठांची विक्री किंवा शेतकऱ्यांकडून जादा दर आकारला जाणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या कारणांमुळे कारवाई कृषिसेवा केंद्रांच्या तपासणीदरम्यान विविध प्रकारच्या अनियमितता आढळून आल्याचे कृषी विभागाने नमूद केले आहे.

त्यामध्ये ई-पॉस मशीनमध्ये अनियमितता असणे, दरफलक व साठाफलक अद्ययावत न ठेवणे, आवश्यक अभिलेखे व्यवस्थित न ठेवणे, एन-फॉर्ममध्ये साठा रजिस्टर न ठेवणे तसेच शेतकऱ्यांना खरेदीची पावती न देणे यांचा समावेश आहे. कृषी निविष्ठा खरेदी करताना शेतकऱ्यांनीही दक्षता घेणे आवश्यक आहे. अधिकृत कृषिसेवा केंद्रातूनच बियाणे, खते व कीटकनाशके खरेदी करावीत. प्रत्येक खरेदीची पक्की पावती किंवा बिल आवर्जून घ्यावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. नियमभंग आढळल्यास तक्रार करा एखाद्या कृषिसेवा केंद्राकडून जादा दराने विक्री, पावती न देणे, साठा किंवा दरफलक न लावणे अथवा इतर नियमांचे उल्लंघन होत असल्यास शेतकऱ्यांनी संबंधित कृषी अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी. तालुकानिहाय कृषी अधिकारी (गुणवत्ता नियंत्रण) यांच्याकडे तसेच जिल्हास्तरीय ७६२७०३७४०८ या क्रमांकावर व्हॉट्सॲपद्वारे तक्रार करता येणार आहे खरीप हंगामात कृषी निविष्ठांच्या उपलब्धतेपासून त्यांच्या गुणवत्तेपर्यंत आणि विक्रीदरापर्यंत सर्व बाबींवर लक्ष ठेवण्यात येणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर यापुढेही कारवाई सुरू राहणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

# छत्रपती संभाजीनगर मध्यच्या शहराध्यक्षपदी जीशान देशमुख

जन सम्राट टाईम्स

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी:** छत्रपती संभाजीनगर मध्य विधानसभा मतदारसंघात एमआयएमने संघटनात्मक बांधणीला वेग देत नवीन शहर कार्यकारिणीची घोषणा केली आहे. हज हाऊसच्या सभागृहात शुक्रवारी झालेल्या कार्यक्रमात शहराध्यक्ष नासेर सिद्दीकी यांनी जंबो शहर कार्यकारिणी जाहीर केली. यावेळी प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र व पेन देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. नवीन कार्यकारिणीत एकूण २९ पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला असून, आगामी काळात पक्ष संघटन मजबूत करण्याची जबाबदारी या टीमवर सोपविण्यात आली आहे. जीशान देशमुख यांच्यावर शहराध्यक्षपदाची जबाबदारी छत्रपती संभाजीनगर मध्यच्या शहराध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी मागील अनेक वर्षांपासून राजकारणात सक्रिय असलेले युवा नेते जीशान मुकीम देशमुख यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. तर मुसेफ कुरेशी यांची कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. दोन्ही पदाधिकाऱ्यांसह नव्याने नियुक्त करण्यात आलेली २९ जणांची टीम पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी काम करणार आहे. छत्रपती संभाजीनगर मध्य विधानसभा मतदारसंघात एमआयएमने संघटनात्मक बांधणीला वेग देत नवीन शहर कार्यकारिणीची घोषणा केली आहे. हज हाऊसच्या सभागृहात शुक्रवारी झालेल्या कार्यक्रमात शहराध्यक्ष नासेर सिद्दीकी यांनी जंबो शहर कार्यकारिणी जाहीर केली. यावेळी प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र व पेन २९ पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला असून, आगामी काळात पक्ष संघटन मजबूत करण्याची जबाबदारी या टीमवर सोपविण्यात आली.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# ममुराबादमध्ये बळीराजाचा सन्मान; बैलपोळा साजाचे उत्साहात वाटप

## प्रतापराव गुलाबरावजी पाटील यांच्या हस्ते वाटप



जन सम्राट टाईम्स

**ममुराबाद | प्रतिनिधी :** कष्टकरी बळीराजाच्या जिव्हाळ्याचा सण असलेल्या बैलपोळ्याचे औचित्य साधून ममुराबाद येथे शेतकरी बांधवांसाठी बैलपोळा साज वाटप कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. श्री प्रतापराव गुलाबरावजी पाटील यांच्या शुभहस्ते शेतकरी बांधवांना बैलपोळ्यासाठी आवश्यक असलेल्या साजाचे वाटप करण्यात आले. शेतकऱ्याच्या जीवनात बैलपोळा सणाला विशेष महत्त्व आहे. वर्षभर शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावून शेतीच्या कामात साथ देणाऱ्या सर्जा-राजाला या दिवशी सजवून त्याची पूजा केली जाते. या परंपरेला जपत शेतकरी बांधवांचा पोळ्याचा आनंद द्विगुणित करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. शेतकऱ्यांच्या आनंदात सहभागी होण्याचा प्रयत्न पोळ्याच्या सणासाठी शेतकरी आपल्या लाडक्या बैलजोडीला सजवण्यासाठी विविध साहित्याची खरेदी करतात. शेतकऱ्यांच्या या आनंदात सहभागी होत त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याच्या भावनेतून साज वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शेतकरी बांधवांना बैलपोळा सणाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. शेतकरी सुखी व समृद्ध राहावा आणि त्याच्या कष्टाला योग्य मोबदला मिळावा, अशी सदिच्छा यावेळी व्यक्त करण्यात आली. मान्यवरांसह ग्रामस्थांची उपस्थिती कार्यक्रमाला ममुराबादचे उपसरपंच विलास सोनावणे तसेच गावातील युवा नेते राहुलभाऊ ढाके यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय गावातील प्रमुख मान्यवर, ज्येष्ठ नागरिक, तरुण कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैलपोळ्यानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे शेतकरी बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, बळीराजाच्या कष्टाचा आणि त्याच्या जिवाभावाच्या सर्जा-राजाचा सन्मान करणारा हा उपक्रम कौतुकाचा विषय ठरला.कष्टकरी बळीराजाच्या जिव्हाळ्याचा सण असलेल्या बैलपोळ्याचे औचित्य साधून ममुराबाद येथे शेतकरी बांधवांसाठी बैलपोळा साज वाटप कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. श्री प्रतापराव गुलाबरावजी पाटील यांच्या शुभहस्ते शेतकरी बांधवांना बैलपोळ्यासाठी आवश्यक असलेल्या साजाचे वाटप करण्यात आले.

# श्रमशाळांमधील दोन विद्यार्थिनींचा करुण अंत; नाशिक जिल्ह्यातील घटना, 3 अधिकाऱ्यांचे निलंबन

जन सम्राट टाईम्स

**नाशिक । प्रतिनिधी:** गडचिरोलीतील जपतलाई आश्रमशाळेतील विद्यार्थिनींच्या मृत्यूचे प्रकरण ताजे असतानाच शुक्रवारी (दि. ४) नाशिक जिल्ह्यात एकाच दिवशी दोन विद्यार्थिनींचा मृत्यू झाला. कळवण तालुक्यातील विसापूर येथील आश्रमशाळेतील दुसरीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू झाला, तर त्र्यंबकेश्वर तालुक्यात आश्रमशाळेतील विद्यार्थिनीने गळफास घेऊन जीवन संपवलं. यामुळे आदिवासी संघटना आक्रमक झाल्या असून, विसापूर प्रकरणी तीन अधिकाऱ्यांचे निलंबन झाले आहे. विसापूर (ता. कळवण) आश्रमशाळेत इयत्ता दुसरीतील सृष्टी ओंकार सूर्यवंशी या विद्यार्थिनीला गुरुवारी रात्री वसतिगृहातच ताप येऊन उलट्या झाल्याने रुग्णालयात नेत असताना, रस्त्यातच तिचा मृत्यू झाला. यामुळे आदिवासी संघटना आक्रमक झाल्या असून, त्यांनी नाशिक शासकीय रुग्णालयात धाव घेऊन आदिवासी विकासमंत्री, आयुक्त आणि सचिवांच्या राजीनाम्याची मागणी केली. या प्रकरणी आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड यांनी चौकशीचे आदेश देऊन शिक्षण



विस्तार अधिकाऱ्यासह तिघांवर निलंबनाची कारवाई केली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला CJP चा पाठिंबा; नाशिकमधून अभिजीत दिपके यांची मोठी घोषणा दुसरी घटना त्र्यंबकेश्वर येथे घडली. त्र्यंबकेश्वरमध्येही शासकीय आश्रमशाळेतील लावण्या लहुदास भोंडवे (वय १३) या विद्यार्थिनीने आश्रमशाळेतून आल्यानंतर गणवेशाच्या ओढणीने राहत्या घरी गळफास घेऊन जीवन संपवले. मृत्यू संशयास्पद असल्याचा आरोप कुटुंबीयांनी केल्यानंतर आदिवासी विभागाने घटनेची चौकशी सुरू केली आहे. दरम्यान, आदिवासी विकासमंत्री, सचिव व आयुक्तांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आदिवासी विद्यार्थ्यांनी सुरू केलेले बेमुदत उपोषण शुक्रवारी मागे घेण्यात आले; मात्र आंदोलन कायम आहे.

विसापूर शासकीय आश्रमशाळेतील सृष्टी सूर्यवंशी या विद्यार्थिनीच्या संशयास्पद मृत्यूची घटना समोर येताच आदिवासी आंदोलकांनी जिल्हा रुग्णालयात धाव घेत दोषींवर कारवाईची आक्रमक मागणी केली. येथे पोलिसांनी मोठा फौजफाटा तैनात करत आंदोलकांशी चर्चा केली. त्यामुळे जिल्हा रुग्णालयाला छावणीचे स्वरूप प्राप्त झाले. दोषींवर कारवाई केली नाही, तर मृत सृष्टीचा मृतदेह थेट आदिवासी आयुक्तालयात नेण्याचा इशारा आंदोलकांनी दिला. त्यानंतर संबंधित आश्रमशाळेतील अधीक्षिकांसह शिक्षण विस्तार अधिकारी आणि मुख्याध्यापक यांना निलंबित करण्यात आले.

# मीनाताई ठाकरे स्मृतिदिनानिमित्त नंदुरबारात शिवसैनिकांकडून अभिवादन

## शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात स्मृतिदिन कार्यक्रम

जन सम्राट टाईम्स

**नंदुरबार । प्रतिनिधी:** शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालय, नंदुरबार येथे मासाहेब मीनाताई ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मीनाताई ठाकरे यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या कार्याला आदरांजली अर्पण केली. या कार्यक्रमाला शिवसेनेचे उपनेते तथा नंदुरबार जिल्ह्याचे संपर्कप्रमुख गुलाबरावजी वाघ, जिल्हाप्रमुख पंडित माळी, जिल्हा सचिव दिनेश सोनवणे, युवासेना जिल्हाप्रमुख सागर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख सोनल चव्हाण, शिवसेना कार्याध्यक्ष मन्नानगणी शिकलीकर, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष इम्तियाज कुरेशी, युवासेना सहप्रमुख एजाज काजी, वाहतूक सेना शहरप्रमुख खंडू माळी, अल्पसंख्यांक आघाडी उपप्रमुख इम्तियाज खान, जनक त्रिवेदी यांच्यासह शिवसेनेचे विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या



संख्येने उपस्थित होते. मीनाताई ठाकरे यांच्या कार्याला उजाळा यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मीनाताई ठाकरे यांच्या सामाजिक आणि संघटनात्मक कार्याचे स्मरण केले. त्यांच्या विचारांना आणि कार्याला अभिवादन करत शिवसेनेच्या संघटनात्मक वाटचालीत कार्यकर्त्यांनी एकजुटीने योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाच्या निमित्ताने शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात भावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आदरपूर्वक अभिवादन करून मीनाताई ठाकरे यांच्या स्मृतींना नमन केले. नंदुरबार येथे मासाहेब मीनाताई ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मीनाताई ठाकरे यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या कार्याला आदरांजली अर्पण केली. या कार्यक्रमाला शिवसेनेचे उपनेते तथा नंदुरबार जिल्ह्याचे संपर्कप्रमुख गुलाबरावजी वाघ, जिल्हाप्रमुख पंडित माळी, जिल्हा सचिव दिनेश सोनवणे, युवासेना जिल्हाप्रमुख सागर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख सोनल चव्हाण, शिवसेना कार्याध्यक्ष मन्नानगणी शिकलीकर, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष इम्तियाज कुरेशी, युवासेना सहप्रमुख एजाज काजी, वाहतूक सेना शहरप्रमुख खंडू माळी, अल्पसंख्यांक आघाडी उपप्रमुख इम्तियाज खान, जनक त्रिवेदी यांच्यासह शिवसेनेचे विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंपिरियल इंटरनॅशनल स्कूलमध्ये गोपिकांनी फोडली दहीहंडी!

जन सम्राट टाईम्स

**पाळधी। प्रतिनिधी:** श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त इंपिरियल इंटरनॅशनल स्कूल, पाळधी येथे विविध उपक्रमांचे आयोजन करत जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्री-प्रायमरी विभागातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण आणि राधेची आकर्षक वेशभूषा करून कार्यक्रमात सहभाग घेत उपस्थितांची मने जिंकली. चार थरांची मानवी



मनोरा; विद्यार्थ्यांचा थरार जन्माष्टमीच्या निमित्ताने शाळेच्या प्रांगणात विशेष दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दहीहंडी फोडण्याची संधी देण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्साहाने एकावर एक असे चार थर रचत दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न केला. या थरारक क्षणांना उपस्थित विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. विद्यार्थ्यांच्या साहसाचे तसेच सांघिक प्रयत्नांचे उपस्थितांनी कौतुक केले.

# आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात जळगावात महामोर्चाची तयारी



जन सम्राट टाईम्स


**जळगाव| प्रतिनिधी:** आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात आरक्षण उपवर्गीकरण विरोधी लोक संघर्ष समिती, जळगाव जिल्ह्याच्या वतीने जनआक्रोश महामोर्चाचे आयोजन करण्यात येणार असून, या महामोर्चाच्या पूर्वनियोजित आणि नियोजनबद्ध आयोजनासाठी रविवार, ६ सप्टेंबर रोजी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक दुपारी २ वाजता पद्मालय विश्रामगृह, जळगाव येथे होणार आहे. आरक्षणाच्या प्रश्नावर आपली भूमिका मांडण्यासाठी तसेच उपवर्गीकरणाच्या विरोधात संविधानिक मार्गाने व्यापक लढा उभारण्याच्या उद्देशाने या जनआक्रोश महामोर्चाचे नियोजन करण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. महामोर्चा मोठ्या संख्येने आणि शिस्तबद्ध पद्धतीने यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील विविध भागांतील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समविचारी संघटनांना या नियोजन बैठकीसाठी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महामोर्चाच्या आयोजनासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवर बैठकीत चर्चा होणार आहे. मोर्चाचे नियोजन, सहभागी संघटनांचा समन्वय, कार्यकर्त्यांची जबाबदारी, जनजागृती तसेच नागरिकांपर्यंत आंदोलनाची भूमिका पोहोचविण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत यावेळी विचारविनिमय केला जाणार आहे. आरक्षण बचाव आणि उपवर्गीकरणाचा विरोध हा या आंदोलनाचा प्रमुख मुद्दा असल्याचे समितीच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. आरक्षणाच्या विषयावर संबंधित घटकांच्या मागण्या आणि भूमिका प्रभावीपणे मांडण्यासाठी संघटितपणे आवाज उठविण्याची गरज असल्याचे आयोजकांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी, विविध संघटनांचे कार्यकर्ते आणि समविचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी बैठकीला आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन आरक्षण उपवर्गीकरण विरोधी लोक संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान, जनआक्रोश महामोर्चाच्या माध्यमातून आरक्षणाच्या प्रश्नावर व्यापक जनमत तयार करण्याचा प्रयत्न केला जाणार असून, पुढील आंदोलनाची दिशा आणि स्वरूप बैठकीत निश्चित होण्याची शक्यता आहे.

# MPSC पेपरफुटी प्रकरणात मोठा ट्विस्ट

## ऋतुजा पाटील- गौरव पाटील यांच्यातील 270 पानांच्या चॅट्समधून तपासाला नवी दिशा

जन सम्राट टाईम्स

**मुंबई : । प्रतिनिधी :** राज्यभरात गाजलेल्या MPSC परीक्षेच्या (MPSC) पेपरफुटीवरुन आता कारवाईला वेग आला आहे. या प्रकरणात अनेक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. एमपीएससी (MPSC Paper Leak Case) औषध निरीक्षक पेपरफुटी प्रकरणी नंदुरबार येथून ऋतुजा पाटीलला देखील अटक करण्यात आली होती. पोलिसांनी नंदुरबारमध्ये (Nandurbar) ऋतुजाला ताब्यात घेऊन चौकशी केल्यानंतर तिला अटक करण्यात आली. या प्रकरणाच्या तपासामध्ये काही महत्त्वाच्या गोष्टी समोर आल्या आहेत. 270 पानांच्या व्हॉट्सॲपवरील (WhatsApp) चॅट्समधून तपासाला नवी दिशा प्राप्त झाली आहे. MPSC ड्रग इन्स्पेक्टर पेपरफुटी प्रकरणात आरोपी ऋतुजा पाटीलचा मोबाईल उल्हास नदीत फेकल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, सहआरोपी लोकेश उर्फ गौरव पाटीलच्या मोबाईलमधून ऋतुजा आणि गौरव यांच्यातील तब्बल 270 पानांच्या WhatsApp चॅट्स क्राईम ब्रँचकडून हस्तगत करण्यात आले आहेत.22 मार्च 2026 रोजीच्या MPSC परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका/प्रश्नसंचाच्या कथित देवाणघेवाणीचा क्रम चॅट्सच्या माध्यमातून तपासले जात आहे.




20 मार्चच्या चॅटमध्ये ऋतुजाने एका प्रश्नसंचातील प्रश्न परीक्षेत येऊ शकतात, तसेच इतर 10 प्रश्न मुद्दाम चुकीचे सोडवावे लागतील, असा उल्लेख केल्याचा दावा करण्यात आलेला आहे. 22 मार्चच्या चॅटमध्ये दिलेल्या प्रश्नांपैकी 78 प्रश्न परीक्षेत आल्याचा ऋतुजाचा कथित दावा या चॅटमधून समोर आला आहे. आणखी 13 प्रश्न सोडवल्याने एकूण 91 प्रश्न सोडवल्याचे चॅटमध्ये म्हटल्याचा तपास यंत्रणेचा दावा आहे. चॅट्समध्ये वॉन्टेड आरोपी मयूर ठाकरे याचाही उल्लेख करण्यात आल्याचं समोर आलं आहे; त्याच्या भूमिकेचा देखील तपास सुरू आहे. ऋतुजाच्या वडिलांनी मयूर ठाकरेला प्रकरणाची माहिती कुणालाही, अगदी घरच्यांनाही न सांगण्यास सांगितल्याचा चॅटमध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे. पेपरसाठी 5 लाखांची मागणी झाल्याचाही चॅटमध्ये उल्लेख आहे.

दुसऱ्या दिवसापर्यंत रक्कम जमवण्याबाबत चर्चा झाल्याचं चॅटमधून समोर आलं आहे. ऋतुजाचा मोबाईल अद्याप सापडलेला नसल्याने गौरवच्या मोबाईलमधील चॅट्स महत्त्वाचा डिजिटल पुरावा ठरत आहेत. या पेपरफुटीत इतर कोणाचा सहभागी आहे का?,

पेपरफुटीचा नेमका प्रवाह आणि मयूर ठाकरेची भूमिका याचा क्राईम ब्रँचकडून तपास सुरू आहे, पुढील तपासात देखील अनेक धक्कादायक खुलासे समोर येण्याची शक्यता आहेनीट पेपरफुटीनंतर राज्यभरात गाजलेल्या MPSC परीक्षेच्या (MPSC) पेपरफुटीवरुन आता कारवाईला वेग आला आहे. याप्रकरणी गुन्हे शाखेने अगोदरच तीन अधिकाऱ्यांसह 7 जणांना अटक केली होती. त्यानंतर, एमपीएससी औषध निरीक्षक पेपरफुटी प्रकरणी नंदुरबार येथून ऋतुजा पाटीलला देखील अटक करण्यात आली.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# दूध उत्पादक सक्षम झाला, तरच दूध संघ खऱ्या अर्थाने सक्षम”

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे प्रतिपादन; सात तालुक्यांतील ३२८ दूध संस्थांचा सहभाग

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी:** दूध उत्पादक हा दूध संघाचा खरा केंद्रबिंदू असून, दूध उत्पादक सक्षम झाला तरच दूध संघ खऱ्या अर्थाने सक्षम होईल, असे प्रतिपादन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. कापूस उत्पादकांसाठी ज्याप्रमाणे सीसीआय महत्त्वाची भूमिका बजावते, त्याचप्रमाणे दूध उत्पादकांसाठी सहकारी दूध संघ आणि गावपातळीवरील दूध संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे दूध उत्पादकांचे उत्पन्न वाढविणे, त्यांना योग्य बाजारपेठ व दर मिळवून देणे, शासन व एनडीडीबीच्या विविध योजनांचा लाभ पात्र पशुपालकांपर्यंत पोहोचविणे आणि दूध संकलनासोबतच गुणवत्तेत वाढ करण्याला प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. जळगाव जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या वतीने जळगाव येथील यश लॉन्स येथे आयोजित सात तालुक्यांतील दूध उत्पादक संस्थांच्या चेअरमन कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. सहकारी संघाला अधिकाधिक दूध देण्याचे आवाहन दूध व्यवसायामुळे उत्पादकाला नियमित उत्पन्न मिळत असल्याने खाजगी विक्री कमी करून सहकारी दूध संघाला अधिकाधिक दूध देण्याचे आवाहन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. शेतकऱ्यांना पशुपालन व दुग्ध व्यवसायाशी अधिक सक्षमपणे जोडण्यासाठी आवश्यक अर्थसहाय्य उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्यासाठी बँकांनी सहकार्य करावे. कर्ज व अर्थसहाय्याच्या विविध योजनांबाबत बँक अधिकारी आणि दूध उत्पादकांची संयुक्त बैठक दूध संघाने आयोजित करावी, अशी



सूचनाही त्यांनी केली. पशुधन, गोठा व पशुखाद्यासाठी अर्थसहाय्यावर भर पशुपालकांना गाय-म्हैस खरेदीसाठी उपलब्ध अनुदान योजनांचा प्रचलित निकषांनुसार लाभ मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करावा, असे त्यांनी सांगितले. तसेच पशुधन खरेदी, गोठा, पशुखाद्य आणि दुग्ध व्यवसायासाठी कर्जसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बँक अधिकारी व दूध उत्पादकांची संयुक्त बैठक घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. दूध तपासीठी आधुनिक प्रयोगशाळा उभारण्याचा प्रयत्न करावा, गुणवत्तापूर्ण पशुखाद्याच्या वापराला प्रोत्साहन द्यावे आणि दूध गुणवत्तेत सातत्याने सुधारणा करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी नमूद केले. दर तीन महिन्यांनी चेअरमन कार्यशाळा घ्या नवीन दूध संस्थांच्या प्रस्तावांचा विचार करताना त्या संस्थेमुळे दूध संकलन वाढणार आहे का आणि दूध उत्पादकांना त्याचा प्रत्यक्ष फायदा होणार आहे का, याचा विचार करावा, अशी सूचना पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केली. दूध उत्पादकांच्या अडचणी, सूचना आणि अपेक्षांचा नियमित आढावा घेण्यासाठी दर तीन महिन्यांनी चेअरमन कार्यशाळा घेण्यात यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. संघाच्या आवश्यक बाबींसाठी जिल्हा नियोजनाच्या माध्यमातून शक्य ते सहकार्य करण्याची ग्वाही पालकमंत्री तथा दूध संघाचे संचालक गुलाबराव पाटील यांनी दिली.

सात तालुक्यांतील ३२८ संस्थांचा सहभाग या कार्यशाळेत जळगाव, धरणगाव, एरंडोल, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर आणि जामनेर या सात तालुक्यांतील तब्बल ३२८ दूध उत्पादक संस्थांचे चेअरमन, सचिव व प्रतिनिधी सहभागी झाले. प्रतिनिधींनी दूध संकलन, गुणवत्ता, पशुखाद्य, पशुपालन आणि संघाकडून अपेक्षित सुविधांबाबत विविध अडचणी व सूचना मांडल्या. त्यांच्या प्रश्नांना संघाचे कार्यकारी संचालक शैलेश मोरखडे यांनी उत्तरे देत प्राप्त सूचना व अडचणींवर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले. दूध गुणवत्ता सुधारण्यावर भर संचालक प्रमोद पाटील यांनी खाजगी दूध विक्री कमी करून संघाचे दूध संकलन वाढविण्यासोबतच दुधातील फॅट आणि एसएनएफचे प्रमाण व गुणवत्ता सुधारण्यावर भर देण्याचे आवाहन केले. सालबर्डी संस्थेचे अमोल पाटील आणि कळमसळे संस्थेचे रोहित पाटील यांनी दूध उत्पादकांसाठी संघामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक करून संघाच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. २२ दूध संस्थांचा सन्मान उत्कृष्ट कामकाज करणाऱ्या तसेच संघाला सातत्याने गुणवत्तापूर्ण दूध पुरवठा करणाऱ्या सुमारे २२ दूध उत्पादक संस्थांचा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यशाळेस संचालक मधुकर राणे, अरविंद देशमुख, शामलताई झांबरे, छायाताई देवकर, दगडूदादा चौधरी, रमेश पाटील, नितीन चौधरी, प्रमोद पाटील, कार्यकारी संचालक शैलेश मोरखडे यांच्यासह संघाचे अधिकारी, कर्मचारी तसेच दूध संस्थांचे चेअरमन, सचिव व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संकलन विभागाचे व्यवस्थापक जयेश पाटील यांनी केले. दूध संघाचे संचालक रमेश आप्पा पाटील यांनी आभार मानले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

## चोपडा मतदारसंघात विकासाची गंगा; विकासकामांना सुरुवात!

जन सम्राट टाईम्स



**चोपडा | प्रतिनिधी :** चोपडा विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांना मोठी चालना मिळाली असून, आमदार प्रा. चंद्रकांत बळीराम सोनवणे यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या विविध विकासकामांचे भूमिपूजन दि. ६ व ७ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात येणार आहे. शहरासह ग्रामीण भागातील तब्बल ३ कोटी ६ लाख ८४ हजार रुपयांच्या विकासकामांना यामुळे सुरुवात होत आहे. रस्ते, गटारी, सार्वजनिक स्वच्छतागृहे, आरोग्य सुविधा, शाळा दुरुस्ती तसेच स्मशानभूमी अशा मूलभूत सुविधांच्या कामांना मंजुरी मिळाल्याने मतदारसंघातील विकासकामांना वेग मिळणार आहे. शहरातील रस्ते आणि नागरी सुविधांना बळ चोपडा नगरपरिषद हद्दीतील विविध भागांमध्ये रस्ते आणि सार्वजनिक सुविधांसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. बायपास ते एसटीपी रस्ता : रस्ता खडीकरणासाठी ३२ लाख रुपये. प्रभाग क्रमांक १४ : घर संसार किराणा दुकानापासून मित्तल पार्कपर्यंत गटारीसह रस्ता काँक्रीटीकरणासाठी ५० लाख रुपये. समतानगर : विविध रस्त्यांच्या विकासासाठी ५५ लाख ५० हजार रुपये. पंचशील नगर : सुभाष शिरसाठ यांच्या घरापासून मुख्य फायर स्टेशन डेपोपर्यंत रस्ता काँक्रीटीकरणासाठी १० लाख रुपये. प्रभाग क्रमांक ९ : अरुणनगर, श्रीरामनगर आणि अरुणनगर कोर्ट रस्त्याजवळ प्रत्येकी २० सीट क्षमतेच्या सार्वजनिक शौचालयांच्या बांधकामासाठी ३६ लाख ४२ हजार रुपये. ग्रामीण भागातही विकासकामांचा धडाका चोपडा मतदारसंघातील ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांनाही या विकासकामांत प्राधान्य देण्यात आले आहे. वाळकी : आरोग्य उपकेंद्रासाठी १८ लाख ५० हजार रुपये. कुसुंबा ते अनवर्दे बु. : १.५ किलोमीटर रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी ३० लाख रुपये. विटनेर : सांत्वन मंडपासाठी १० लाख रुपये. वढोदा : शाळेच्या खोलीच्या दुरुस्तीसाठी ३ लाख रुपये. अर्जंटीसीम, कुसुंबा व वेळोदे : रस्ते काँक्रीटीकरणासाठी प्रत्येकी ५ लाख रुपये. गलंगी : स्मशानभूमी बांधकामासाठी १० लाख रुपये. मूलभूत सुविधांना प्राधान्य रस्ते, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता आणि सार्वजनिक सुविधा या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित बाबींना विकासकामांमध्ये प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांना या कामांचा थेट लाभ मिळणार आहे. या विकासकामांचे भूमिपूजन आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्या हस्ते होणार असून, माजी आमदार सौ. लताताई चंद्रकांत सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. नागरिकांकडून समाधान मतदारसंघातील विविध भागांमध्ये एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर विकासकामांना मंजुरी मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

## स्पेलिंग बी स्पर्धेत भोजे जि.प. शाळेचे घवघवीत यश!

### विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय कामगिरीने शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा

जन सम्राट टाईम्स



**भडगाव। प्रतिनिधी:** शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित स्पेलिंग बी स्पर्धेत जि. प. प्राथमिक शाळा भोजेच्या विद्यार्थ्यांनी केंद्रस्तरावर घवघवीत यश संपादन केले आहे. पिंपळगाव येथे ४ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या केंद्रस्तरीय स्पर्धेत भोजे शाळेच्या विद्यार्थ्यांनी चारही गटांत प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली. शिक्षण विभागाच्या वतीने प्रथम शाळास्तरावर स्पेलिंग बी स्पर्धा घेण्यात आली. त्यानंतर केंद्रस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. केंद्रप्रमुख सखाराम महाजन तसेच केंद्रातील ज्येष्ठ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. चारही गटांतभोजे शाळेचा दबदबा केंद्रातील विविध शाळांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग घेतला. चुरशीच्या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विचारण्यात आलेल्या विविध इंग्रजी शब्दांची अचूक स्पेलिंग सांगत आपल्या ज्ञानाचे आणि तयारीचे प्रभावी प्रदर्शन केले. यामध्ये भोजे शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत चारही गटांत प्रथम क्रमांक मिळवला.

पहिला गट : स्वदीप दीपक जाधव — प्रथम क्रमांक

दुसरा गट : वैधवी दिलीप पवार — प्रथम क्रमांक

तिसरा गट : वैष्णवी जितेंद्र उबाळे व माधवी अरुण चौथे — प्रथम क्रमांक

चौथा गट : सायना — प्रथम क्रमांक

चारही गटांमध्ये प्रथम क्रमांक मिळवत भोजे शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. शिक्षकांच्या मेहनतीला विद्यार्थ्यांच्या परिश्रमांची जोड या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची तयारी सर्व वर्गशिक्षकांनी विशेष मेहनत घेऊन करून घेतली होती. विद्यार्थ्यांना इंग्रजी शब्दांचे अचूक लेखन, उच्चार आणि स्पेलिंग याबाबत सातत्याने मार्गदर्शन करण्यात आले. केंद्रप्रमुख तसेच मुख्याध्यापकांचे विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि प्रोत्साहन लाभले. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची अथक मेहनत यामुळे हे उल्लेखनीय यश मिळवता आल्याची भावना व्यक्त करण्यात आली. पालक व ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव भोजे शाळेच्या विद्यार्थ्यांनी केंद्रस्तरीय स्पेलिंग बी स्पर्धेत चारही गटांत प्रथम क्रमांक पटकावल्याने शाळेतील शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विजेत्या विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## भूषण पाटील यांनी शासकीय वेळेनंतरही कार्यालयात थांबून केली शेतकऱ्यांची कामे

### ‘कर्तव्य आणि लोकसेवेचा मेळ’ साधण्याचा प्रयत्न

जन सम्राट टाईम्स



**लासुर । (प्रतिनिधी):** महसूल विभागातील अधिकारी वेळेवर उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी अधूनमधून समोर येत असताना, चोपडा तालुक्यातील लासुर येथे मात्र ग्राम महसूल अधिकारी भूषण आप्पा पाटील यांच्या कार्यतत्परतेचे सकारात्मक चित्र पाहायला मिळत आहे. शेतकऱ्यांची विविध महसुली कामे वेळेत मार्गी लागावीत यासाठी भूषण पाटील हे रात्री आठ ते साडेआठ वाजेपर्यंत कार्यालयात थांबून कामकाज करत असल्याचे चित्र आहे.

शेतीचा हंगाम, विविध शासकीय योजना, दाखले, फेरफार नोंदी आणि इतर महसुली कामांसाठी सध्या शेतकऱ्यांची कार्यालयात मोठी वर्दळ असते. दिवसभर शेतात काम केल्यानंतर अनेक शेतकऱ्यांना सायंकाळच्या वेळेतच कार्यालयीन कामांसाठी वेळ मिळतो. ही बाब लक्षात घेऊन पाटील हे उशिरापर्यंत कार्यालयात उपलब्ध राहत असल्याने शेतकऱ्यांचा वेळ आणि होणारा त्रास कमी होत आहे. शेतकऱ्यांच्या कामांना प्राधान्य दाखले, फेरफार नोंदी तसेच विविध महसुली कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करून त्यांची कामे शक्य तितक्या तत्परतेने पूर्ण करण्यावर भर दिला जात असल्याचे सांगण्यात येते. विशेष म्हणजे, शासकीय मोहिमेचे कामकाज आणि नागरिकांची दैनंदिन कामे या दोन्हींचा समतोल साधण्याचा प्रयत्न होत असल्याने लासुर परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांकडून भूषण पाटील यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले जात आहे.

‘माझे काम आणि कर्तव्य’ आपल्या उशिरापर्यंतच्या कामकाजाबाबत ग्राम महसूल अधिकारी भूषण आप्पा पाटील म्हणाले, “सध्या विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या आदेशान्वये शासकीय जमीन, भोगवटादार वर्ग-२ जमीन, सीलिंग जमीन, नवीन अविभाज्य शर्तींच्या जमिनी, आदिवासी जमीन आणि वाटप जमिनी याबाबतीत ‘शर्तभंग शोध मोहीम’ सुरू आहे. या मोहिमेच्या अंमलबजावणीची मुख्य जबाबदारी ग्राम महसूल अधिकारी म्हणून माझ्यावर आहे.

मोहिमेचे काम वेळेत पूर्ण करतानाच शेतकरी बांधवांच्या दैनंदिन कामात किंवा दाखले मिळण्यात विलंब होऊ नये, यासाठी कार्यालय उशिरापर्यंत सुरू ठेवावे लागते. मोहिमेचे कामकाज आणि शेतकरी बांधवांची सेवा दोन्ही एकत्र पार पडत असल्याचा आनंद आहे.” कर्तव्यदक्षतेचे ग्रामस्थांकडून कौतुक शासकीय कामकाजासोबतच नागरिकांच्या सोयीला प्राधान्य देण्याच्या या कार्यपद्धतीचे लासुर परिसरातील शेतकरी, ज्येष्ठ नागरिक आणि युवकांकडून कौतुक होत आहे

## महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या दहीहंडीला दिग्गजांची हजेरी; दहीहंडीत तरुणाईची रेकॉर्डब्रेक गर्दी!

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी:** उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या दहीहंडींपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फाईट ग्रुपच्या दहीहंडी उत्सवाला यंदा तरुणाईचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पालकमंत्री, आमदार, खासदार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीने प्रकाश टॉकीज चौकातील दहीहंडीचा उत्सव चांगलाच रंगला. आकर्षक दहीहंडी, डीजेच्या तालावर थिरकणारी तरुणाई आणि सर्वधर्म समतेचा संदेश हे या उत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरले. सामाजिक कार्यकर्ते तथा फाईट ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष नाना साळवे यांच्या माध्यमातून धुळे शहरातील प्रकाश टॉकीज चौकात प्रथमच या भव्य दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते.

फाईट ग्रुपमध्ये विविध जाती-धर्मातील तरुणांचा सहभाग असल्याने ‘समतेची दहीहंडी’ म्हणून या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. दिग्गजांची हजेरी; तरुणाईचा उत्साह द्विगुणित दहीहंडी उत्सवाला धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, आमदार अनुप अग्रवाल, युवा सेनेचे




उत्तर महाराष्ट्राचे नेते अविष्कार भुसे, खासदार डॉ. सुभाष भामरे यांच्यासह विविध राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावत आयोजकांना शुभेच्छा दिल्या.

दिग्गजांच्या उपस्थितीमुळे तरुणाईचा उत्साह आणखी वाढला. डीजेच्या तालावर सुरू असलेल्या जल्लोषात अनेक मान्यवरांनाही ठेका धरण्याचा मोह आवरता आला नाही. यावेळी ‘हत्ती घोडा पालखी, जय कन्हैयालाल की’ अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. सर्वधर्म समतेचा संदेश फाईट ग्रुपच्या दहीहंडीचे वैशिष्ट्य म्हणजे विविध जाती-धर्मातील तरुणांचा असलेला सहभाग. या माध्यमातून सामाजिक एकोपा आणि सर्वधर्म समतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या अभिनव उपक्रमाचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्यासह उपस्थित दिग्गजांनी कौतुक केले. सामाजिक सलोखा आणि एकतेचा संदेश देणाऱ्या अशा उपक्रमांना प्रोत्साहन मिळणे आवश्यक असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. रात्री दहा वाजेपर्यंत जल्लोष सायंकाळी ७ वाजेपासून सुरू झालेला दहीहंडी उत्सव रात्री १० वाजेपर्यंत उत्साहात सुरू होता. परिसरात मोठ्या संख्येने तरुणाई आणि नागरिकांची गर्दी झाली होती. अखेर मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा पैलवान रावसाहेब गिरासे यांच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात आली. दहीहंडी फुटताच उपस्थितांनी जल्लोष करत उत्सवाचा आनंद लुटला.

## नशिराबादच्या मुख्य प्रवेशद्वारावर अंधार; बंद लाईट दुरुस्त करण्याची मागणी!

### संत श्री झिपरू अण्णा महाराज यांच्या नावाने उभारलेल्या प्रवेशद्वाराकडे दुर्लक्ष; नागरिकांमध्ये संताप

जन सम्राट टाईम्स



**नशिराबाद । प्रतिनिधी:** खानदेशचे श्रद्धास्थान असलेल्या संत श्री झिपरू अण्णा महाराज यांच्या पवित्र नावाने उभारण्यात आलेल्या नशिराबाद शहराच्या मुख्य प्रवेशद्वारावर सध्या अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या या भव्य प्रवेशद्वारावरील एका बाजूची लाईट गेल्या काही दिवसांपासून बंद असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. शहरात येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांसाठी हे प्रवेशद्वार महत्त्वाचे असून, रात्रीच्या वेळी येथे पुरेसा प्रकाश नसल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे बंद लाईट तातडीने दुरुस्त करून प्रवेशद्वार परिसरात पुरेशी रोषणाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रवेशद्वार अंधारात; सुरक्षेचा प्रश्न गंभीर शहराच्या मुख्य प्रवेशद्वारावर करण्यात आलेली आकर्षक रोषणाई नशिराबादच्या वैभवात भर घालणारी आहे. मात्र, सध्या प्रवेशद्वाराची एक बाजू पूर्णपणे अंधारात असल्याने रात्रीच्या वेळी या मार्गावरून जाणाऱ्या वाहनचालकांना अडचणी येत आहेत. प्रवेशद्वार परिसरात प्रकाश व्यवस्था अपुरी राहिल्यास अपघाताचा धोका तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी चिंता स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे. देखभाल-दुरुस्तीकडे दुर्लक्ष का? शहराच्या सौंदर्यीकरणासाठी विविध कामे केली जात असताना मुख्य प्रवेशद्वारावरील बंद लाईट दुरुस्त करण्यास विलंब का होत आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. संत श्री झिपरू अण्णा महाराज यांच्या नावाशी जोडलेले हे प्रवेशद्वार नशिराबादच्या दृष्टीने धार्मिक आणि भावनिक महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे त्याची नियमित देखभाल आणि प्रकाश व्यवस्था सुरळीत ठेवण्याची जबाबदारी संबंधित प्रशासनाने गांभीर्याने घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. ‘तातडीने दुरुस्ती करा’; नागरिकांची मागणी गेल्या काही दिवसांपासून बंद असलेली लाईट तातडीने सुरू करावी, तसेच प्रवेशद्वारावरील संपूर्ण विद्युत व्यवस्था तपासून आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. प्रवेशद्वारावरील अंधार दूर करून शहराच्या मुख्य प्रवेशद्वाराची पूर्वीची आकर्षक रोषणाई पुन्हा सुरू होणार का? याकडे आता नशिराबादकरांचे लक्ष लागले आहे. नगर परिषद प्रशासनाने नागरिकांच्या तक्रारीची दखल घेऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.खानदेशचे श्रद्धास्थान असलेल्या संत श्री झिपरू अण्णा महाराज यांच्या पवित्र नावाने उभारण्यात आलेल्या नशिराबाद शहराच्या मुख्य प्रवेशद्वारावर सध्या अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या या भव्य प्रवेशद्वारावरील एका बाजूची लाईट गेल्या काही दिवसांपासून बंद असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. शहरात येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांसाठी हे असून, रात्रीच्या वेळी येथे पुरेसा प्रकाश नसल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

## बोदवडच्या घटनेवर नागरिकांच्या मनात संशयाचे वादळ!

जन सम्राट टाईम्स

**बोदवड| प्रतिनिधी :** बोदवड शहरासह परिसरात घडलेल्या गंभीर घटनेने नागरिकांमध्ये खळबळ उडाली असून, या प्रकरणाच्या तपासाबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. एवढ्या गंभीर स्वरूपाचे कृत्य एका व्यक्तीनेच केले का? की या घटनेमागे आणखी कोणाचा सहभाग आहे? असा थेट सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. घटनेचे स्वरूप आणि त्यासंदर्भात समोर येणाऱ्या विविध बाबी पाहता, तपास केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित न ठेवता या प्रकरणाशी संबंधित सर्व शक्य पैलू तपासण्यात यावेत, अशी नागरिकांची मागणी आहे. पूर्वतयारीपासून संभाव्य सहभागापर्यंत तपासाची मागणी या घटनेमागे पूर्वतयारी झाली होती का, संबंधित व्यक्तीला कोणाचे सहकार्य मिळाले होते का, घटनेमागील संभाव्य कारणे कोणती होती, तसेच संबंधित व्यक्तींचे संपर्क आणि इतर परिस्थितीजन्य बाबी काय आहेत, याचा सखोल तपास करण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नागरिकांच्या मते, तपास यंत्रणांनी उपलब्ध पुरावे, तांत्रिक माहिती आणि इतर संबंधित बाबींची पडताळणी करून घटनेची संपूर्ण पार्श्वभूमी स्पष्ट करणे गरजेचे आहे. ‘सत्य बाहेर काढा, जनतेचा संभ्रम दूर करा!’ “नेमके काय घडले? संबंधित व्यक्तीने हे कृत्य एकट्याने केले की त्याला कोणाची मदत मिळाली?” असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. दोषी कोणीही असो, त्याची ओळख आणि सहभाग ठोस पुराव्यांच्या आधारे निश्चित करून कायद्यानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होत आहे. केवळ चर्चांवर किंवा संशयावर आधारित निष्कर्ष न काढता तपास यंत्रणांनी वस्तुनिष्ठ पुराव्यांच्या आधारे सत्य समोर आणावे, अशी अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# भडगावातून 150 क्विंटल संशयास्पद फोर्टिफाइड तांदळाची वाहतूक!

## आयशर ट्रक तहसील कार्यालयात जमा ३०० गोण्यांमधील तांदळावर 'खुल्या बाजारात विक्रीसाठी नाही'चा उल्लेख; बिलांपासून मालाच्या मूळ स्रोतापर्यंत अनेक प्रश्न अनुत्तरित

जन सम्राट टाईम्स

**भडगाव । प्रतिनिधी:** भडगाव शहरातून चाळीसगावकडून पाचोऱ्याच्या दिशेने जाणाऱ्या एका आयशर ट्रकमधून संशयास्पद स्वरूपाचा फोर्टिफाइड तांदूळ वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर महसूल व पुरवठा विभागाने ट्रक ताब्यात घेत तो भडगाव तहसील कार्यालयाच्या आवारात जमा केला. या कारवाईमुळे १५० क्विंटल तांदळाच्या या व्यवहाराबाबत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४ ते ५ वाजेच्या सुमारास चाळीसगावहून पाचोऱ्याकडे जाणारा एमएच-५२-०१३८ क्रमांकाचा आयशर ट्रक पत्रकारांच्या निदर्शनास आला. ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणावर तांदळाच्या गोण्या असल्याचे दिसून आल्यानंतर वाहन थांबविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, चालकाने ट्रक भडगाव शहरातील चाळीसगाव रोडवरून पाचोरा रोडच्या दिशेने पुढे नेल्याने संशय निर्माण झाला. पत्रकारांनी पाठलाग करून पाचोरा रोडवरील संतोषी माता मंदिराजवळ ट्रक थांबवला. चालकाकडून समाधानकारक माहिती मिळत नसल्याने महसूल व पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना याबाबत माहिती देण्यात आली. त्यानंतर नायब तहसीलदार रमेश देवकर, एस. डी. सोनवणे आणि पुरवठा अधिकारी हर्षल भदाणे घटनास्थळी दाखल झाले. अधिकाऱ्यांनी ट्रकची पाहणी केल्यानंतर तो भडगाव तहसील कार्यालयात आणून जमा करण्यात आला. ३०० गोण्या, तब्बल १५० क्विंटल तांदूळ तहसील कार्यालयात ट्रकची झडती घेतली असता प्रत्येकी ५० किलो वजनाच्या सुमारे ३०० गोण्या आढळून आल्या. त्यामुळे एकूण सुमारे १५० क्विंटल तांदूळ



असल्याचे समोर आले. प्रशासनाने या मालाचा पंचनामा करून तांदूळ ताब्यात घेतल्याची माहिती आहे. पुढील तपासणीसाठी तांदळाचे नमुने घेण्यात आले असून, प्रयोगशाळेतील तपासणीनंतर तांदळाचा प्रकार, गुणवत्ता तसेच तो कोणत्या शासकीय अथवा अन्य योजनेशी संबंधित आहे, याबाबत अधिक स्पष्टता येण्याची शक्यता आहे. गोण्यांवरील लेबलमुळे संशय अधिक गडद तांदळाच्या गोण्यांवर 'फोर्टिफाइड राईस' असा उल्लेख असून, त्यामध्ये लोह, फॉलिक ॲसिड आणि व्हिटॅमिन बी-१२ यांसारखी सूक्ष्म पोषक तत्त्वे असल्याचे नमूद असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे गोण्यांवर 'खुल्या बाजारात विक्रीसाठी नाही' असा स्पष्ट उल्लेख असल्याचे दिसून आले. तसेच गोण्यांवर FSSAI क्रमांक 10519006000495 नमूद असल्याने या तांदळाचा नेमका स्रोत आणि त्याचा वापर कोणत्या योजनेसाठी होणार होता, याबाबत अधिकृत तपासणी होणे आवश्यक ठरत आहे. १५० क्विंटल मालाचे बिल; व्यवहाराची सत्यता तपासण्याचे आव्हान दरम्यान, ट्रक चालकाकडे काही बिल व कागदपत्रे आढळून आल्याची माहिती आहे. या कागदपत्रांनुसार चोपडा येथील रोहित ट्रेडिंग कंपनीकडून १५० क्विंटल तांदूळ एस. एम. एम. फूड्स प्रोसेसर्स, वरखेडी, ता. पाचोरा यांना विक्री केल्याचे दाखविण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र, ही कागदपत्रे प्रत्यक्ष व्यवहाराशी संबंधित आहेत का, संबंधित कंपन्यांना अशा प्रकारच्या फोर्टिफाइड तांदळाचा व्यवहार करण्याचा अधिकार आहे का, मालाचा मूळ स्रोत कोणता, वाहतुकीसाठी आवश्यक परवानग्या व कागदपत्रे होती का, याची शहानिशा होणे गरजेचे आहे. विशेषतः 'खुल्या बाजारात विक्रीसाठी नाही' असा उल्लेख असलेला तांदूळ खासगी बिलांवरून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी कसा आणि कोणत्या उद्देशाने वाहतूक केला जात होता, हा प्रश्न या प्रकरणाच्या केंद्रस्थानी आला आहे. दोन दिवस उलटूनही शहानिशेचा प्रश्न ट्रक तहसील कार्यालयात जमा होऊन दोन दिवस उलटत असतानाही संबंधित बिलांची आणि कागदपत्रांची शहानिशा पूर्ण झाली आहे का, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे प्रशासनाचा तपास नेमका कोणत्या टप्प्यावर आहे, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. 'हा तांदूळ नेमका कोणाचा?' नागरिकांचा सवाल फोर्टिफाइड तांदळाच्या गोण्यांवर 'खुल्या बाजारात विक्रीसाठी नाही' असा उल्लेख असताना तो खासगी स्वरूपाच्या बिलांसह वाहतूक होत असल्याचे समोर आल्याने हा तांदूळ नेमका कोणाचा, कोणत्या योजनेसाठी होता आणि तो खासगी वाहतुकीत कसा आला? असे सवाल नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. या प्रकरणात तांदळाच्या नमुन्यांचा प्रयोगशाळा अहवाल, मालाचा मूळ स्रोत, बिलांची सत्यता, संबंधित व्यापारी व प्रक्रिया केंद्राची भूमिका तसेच ट्रकच्या वाहतुकीचा उद्देश यांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. पंचनाम्यानंतर पुढे काय? गुन्हा दाखल होणार का? सध्या ट्रक ताब्यात घेऊन पंचनामा करण्यात आला असला तरी पुढील तपासात माल शासकीय योजनेशी संबंधित असल्याचे किंवा त्याची वाहतूक अथवा विक्री नियमबाह्य पद्धतीने झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांवर काय कारवाई केली जाते, हे महत्त्वाचे ठरणार आहे. तहसीलदार शितल सोलाट यांनी या तांदळाचा नेमका स्रोत तसेच तो रेशन दुकानासाठी आहे की पोषण आहारासाठी, याबाबत अद्याप स्पष्ट भूमिका जाहीर केलेली नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे आता प्रयोगशाळा अहवाल, कागदपत्रांची शहानिशा आणि मालाच्या मूळ स्रोताच्या तपासणीतून या १५० क्विंटल फोर्टिफाइड तांदळाच्या व्यवहाराचे नेमके गौडबंगाल उलगडणार का? याकडे भडगाव तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## गरजू विद्यार्थिनींना शिलाई मशीनचे वाटप



जन सम्राट टाईम्स

**सोयगाव शहर | प्रतिनिधी :** गरजू विद्यार्थिनींना शिक्षणासोबत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने राजकुंवर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, जालना संचलित राजकुंवर महाविद्यालय, बनोटी (ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर) येथे शिलाई मशीन वाटपाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थिनींच्या कौशल्याला व्यावसायिक संधीची जोड देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांसह सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले. शिक्षणासोबत कौशल्य विकासाची गरज कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. भगवानसिंग डोभाळ होते. संस्थेच्या सचिव प्रा. डॉ. संगीता राजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख अतिथी म्हणून कन्नड–सोयगाव मतदारसंघाचे माजी आमदार उदयसिंग राजपूत, बनोटी पोलीस स्टेशनचे संजय सिंघल, भाजप तालुकाध्यक्ष सुनील जाधव आणि स्वप्निल सोनवणे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना शिक्षणासोबत कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. शिलाई मशीनच्या माध्यमातून विद्यार्थिनींना घरबसल्या रोजगाराची संधी निर्माण करता येऊ शकते. त्यातून आर्थिक स्वावलंबन साध्य करून भविष्यात स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देणे हीच खरी सामाजिक बांधिलकी असून, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यासोबतच त्यांना आत्मनिर्भरतेची नवी दिशा मिळते, असेही यावेळी सांगण्यात आले. संस्थेच्या सामाजिक कार्याचा आढावा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. गजानन परदेशी यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. त्यांनी संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यातही विविध उपक्रम राबविण्यात येतील, अशी ग्वाही दिली. विद्यार्थी-विद्यार्थिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रा. एस. आर. सोळंके, प्रा. जी. पी. चौतमल, प्रा. एस. एन. सोळंके, प्रा. एस. एन. सोळंके, प्रा. व्ही. आर. कऱ्हाळे, प्रा. बी. डी. खैरनार, प्रा. एस. डी. महाले, प्रा. एन. एल. सोळंके, प्रा. एस. एस. मोहरे, प्रा. बी. व्ही. सोळंके, प्रा. एम. व्ही. साबळे, प्रा. एस. एन. खैरनार आणि प्रा. ए. आर. राजपूत यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी अविनाश कोतकर, चेतन वेहळे आणि ऋतिक कोतकर उपस्थित होते. महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनीही कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

---

## भालोद येथील कला व महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाचा अभिनव उपक्रम

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ। प्रतिनिधी:** शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसतो, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा, विचारांना दिशा देणारा आणि जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रेरणा देणारा मार्गदर्शक असतो. याच भावनेतून कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त आगळावेगळा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. 'आजचा विद्यार्थी... उद्याचा प्रेरणादायी शिक्षक...' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष शिक्षकाची भूमिका साकारत विविध विषयांवर अध्यापन केले. विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम अनुभवसमृद्ध, प्रेरणादायी आणि आत्मविश्वास वाढविणारा ठरला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. किशोर कोल्हे होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थिनी चेतना नितीन कोळी हिने प्रस्तावना केली. शिक्षक दिनाचे महत्त्व विशद करताना शिक्षक-विद्यार्थी नाते हे केवळ अध्यापनापुरते मर्यादित नसून



संस्कार, प्रेरणा आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्वपूर्ण माध्यम असल्याचे सांगण्यात आले.

विद्यार्थ्यांनी साकारली शिक्षकाची भूमिका

या अभिनव उपक्रमात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिक्षक म्हणून वर्गासमोर उभे राहण्याची संधी मिळाली. पिंकी पावरा (टी.वाय.बी.ए.), वैशाली उदेभान जाधव (एस.वाय.बी.ए.), अतिकेश दत्तात्रय माळी (बहिणाबाई अभ्यासिका), मुकेश दिलीप भालेराव (बहिणाबाई अभ्यासिका), अक्षय अजय कोळी (बहिणाबाई अभ्यासिका), पूजा ज्ञानेश्वर मोरे (टी.वाय.बी.ए.) आणि कोमल धनराज तायडे (एस.वाय.बी.एससी.) आदी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विविध विषयांवर अध्यापन करून आपल्या अध्यापन कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन केले. विषयाचे सादरीकरण, विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, उदाहरणांच्या माध्यमातून संकल्पना स्पष्ट करणे तसेच वर्गातील शिस्त व अध्यापनाची जबाबदारी सांभाळणे, असा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. त्यामुळे शिक्षकाचे कार्य किती जबाबदारीचे, संयमाचे आणि समाजघडणीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना झाली. आत्मविश्वास, नेतृत्व आणि वक्तृत्वाला मिळाले व्यासपीठ अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य प्रा. किशोर कोल्हे यांनी विद्यार्थ्यांच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान आत्मसात न करता आत्मविश्वास, नेतृत्वगुण, वक्तृत्व आणि अध्यापन कौशल्य विकसित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळतो. त्याचबरोबर भविष्यातील जबाबदार नागरिक आणि सक्षम शिक्षक घडण्यासही अशा उपक्रमांची मदत होते, असे प्राचार्य कोल्हे यांनी नमूद केले

---

## पारोळ्यात 'उत्कर्ष Guidance & Study Center'चा शुभारंभ आ. ॲड. अमोलदादा पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

जन सम्राट टाईम्स

**पारोळा: प्रतिनिधी ।** स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या युवक-युवतींना गुणवत्तापूर्ण अभ्यासासाठी शांत, शिस्तबद्ध आणि आधुनिक सुविधांनीयुक्त वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उत्कर्ष फाउंडेशन संचलित 'उत्कर्ष Guidance & Study Center' या अभ्यासिका केंद्राचा शुभारंभ आमदार ॲड. अमोलदादा पाटील यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आला.

पारोळा शहरात स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र आणि सुविधायुक्त अभ्यासिका केंद्र प्रथमच सुरू झाल्याने स्थानिक विद्यार्थ्यांसाठी ही मोठी संधी मानली जात आहे. विद्यार्थ्यांना शहरातच मिळणार अभ्यासाचे योग्य वातावरण आमदार ॲड. अमोलदादा पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाला प्रत्यक्ष स्वरूप देण्यासाठी उत्कर्ष महिला परिवाराच्या अध्यक्षा मा. पूजाताई पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार ॲड. अमोलदादा पाटील म्हणाले की, एरंडोल विधानसभा मतदारसंघातील युवक-युवतींमध्ये गुणवत्ता आणि



क्षमता मोठ्या प्रमाणात आहे. मात्र स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी आवश्यक शांत वातावरण, संदर्भ साहित्य आणि आधुनिक सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध नसल्याने अनेक विद्यार्थ्यांना मोठ्या शहरांकडे जावे लागते. ही परिस्थिती लक्षात घेऊन पारोळ्यातील विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा आपल्या शहरातच उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने या अभ्यासिकेची उभारणी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. "पारोळ्यातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी मोठ्या शहरांकडे जाण्याची गरज भासू नये. त्यांना आपल्या शहरातच चांगल्या सुविधा, शांत वातावरण आणि आवश्यक अभ्यास साहित्य उपलब्ध झाले पाहिजे.

ही माझी भूमिका आहे," असे आमदार पाटील यांनी स्पष्ट केले. माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी अभ्यासाची सुविधा आणि मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे. प्रशासकीय सेवा, पोलीस विभाग, बँकिंग, रेल्वे, महसूल, शिक्षण, आरोग्य, वन विभाग यांसह विविध क्षेत्रांतील स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांना या केंद्राचा लाभ घेता येणार आहे. स्थानिक पातळीवर अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांचा वेळ, प्रवासाचा खर्च आणि मोठ्या शहरांमध्ये राहण्याचा अतिरिक्त आर्थिक भार कमी होण्यास मदत होणार आहे. 'पारोळ्याचे नाव उज्ज्वल करणारे अधिकारी घडावेत' यावेळी भावनिक भावना व्यक्त करताना आमदार ॲड. अमोलदादा पाटील म्हणाले, "आपल्या मतदारसंघातील एखादा विद्यार्थी अधिकारी झाला, मोठ्या पदावर पोहोचला आणि त्याने आपल्या कुटुंबासह पारोळ्याचे नाव उज्ज्वल केले, तर त्यापेक्षा मोठे समाधान दुसरे कोणतेही नाही.


---

## भडगाव तालुक्यात सरपंचपदाच्या आरक्षणाचा थरार

जन सम्राट टाईम्स

भडगाव। प्रतिनिधी:

भडगाव तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी कोणत्या गावाचे पद कोणत्या प्रवर्गासाठी राखीव होणार, याची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे. ग्रामस्थ, इच्छुक उमेदवार, आजी-माजी पदाधिकारी आणि राजकीय कार्यकर्त्यांचे लक्ष लागलेल्या सरपंचपदाच्या आरक्षणाची अधिकृत सोडत ७ आणि ८ सप्टेंबर २०२६ रोजी काढण्यात येणार आहे. मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व




उपसरपंच) निवडणूक नियम, १९६४ मधील नियम २ अ (५) व (६) मधील तरतुदींनुसार ही आरक्षण सोडत होणार आहे. त्यामुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये इच्छुकांच्या राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे. SC-ST आरक्षण कायम; आता OBC आणि सर्वसाधारण प्रवर्गाकडे लक्ष ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या आदेशानुसार जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येच्या प्रमाणानुसार अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या आरक्षणात कोणताही बदल झालेला नाही. आता नागरिकांचा मागास प्रवर्ग (OBC) आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी विशेष सोडत काढण्यात येणार आहे. यामुळे कोणत्या गावात कोणत्या प्रवर्गाचा सरपंच होणार, याचे चित्र दोन दिवसांत स्पष्ट होणार आहे. ७ सप्टेंबरला OBC आणि सर्वसाधारण प्रवर्गाची सोडत दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पंचायत समिती भडगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज हॉलमध्ये सरपंचपदासाठी OBC आणि सर्वसाधारण प्रवर्गाची सोडत काढण्यात येणार आहे.

---

## कुऱ्हा हरदो शाळेत विद्यार्थी बनले शिक्षक! शिक्षक दिन उत्साहात साजरा;

जन सम्राट टाईम्स

**कुऱ्हा हरदो | प्रतिनिधी :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कुऱ्हा हरदो येथे ५ सप्टेंबर २०२६ रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी स्वतः सांभाळत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वतंत्र भारताचे दुसरे राष्ट्रपती, थोर विचारवंत, तत्त्वज्ञानी आणि उत्कृष्ट शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला शाळेचे ग्रेडेड मुख्याध्यापक गजानन कोठाळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी घेतली शिक्षकांची भूमिका शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनीच कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन केले. शाळेतील सर्व शिक्षकांचे विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ देऊन तसेच शब्दसुमनांनी स्वागत केले. विद्यार्थिनींनी स्वतः तयार केलेले आकर्षक लोगो शिक्षकांना भेट म्हणून दिले. याशिवाय प्रत्येक शिक्षकाला विद्यार्थ्यांनी ग्रीटिंग कार्ड देत आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमात द्यिार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जीवनपट आणि शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करणारी भाषणे आणि गीतांचे सादरीकरण केले. यावेळी पूजा पाटील हिने हिंदी भाषेत भाषण केले, तर प्रीती कुंभार आणि पायल इंगळे यांनी मराठी भाषेत आपले विचार मांडले. पायल माळी, पल्लवी माळी आणि मुक्ता माळी यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारे भावपूर्ण गीत सादर केले. शिक्षकांसाठी विद्यार्थिनींची अनोखी भेट इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनींनी सर्व शिक्षकांसाठी सुंदर फोल्डर फाईल तयार केली. या फाईलमध्ये प्रत्येक शिक्षकासाठी शुभेच्छा संदेश लिहिण्यात आले तसेच विद्यार्थ्यांच्या स्वाक्षऱ्याही घेण्यात आल्या. शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका सौ. पुनम वाघोदे यांनी यावेळी मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता सातवीच्या पल्लवी माळी आणि जोगेश्वरी माळी यांनी अत्यंत उत्कृष्टपणे केले. शाळेचे ग्रेडेड मुख्याध्यापक गजानन कोठाळे यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच त्यांच्या कल्पकतेचे आणि उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्रद्धा कुंभार हिने उपस्थितांचे आभार मानले. शिक्षकांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी कार्यक्रमाला केंद्रप्रमुख श्रीमती प्रतिमा चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षक दिनाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रेडेड मुख्याध्यापक गजानन कोठाळे, पुनम वाघोदे, योगेश बोरोले, छाया बहुरूपे, नितीन लांडे,सर्व शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन शिक्षकांची भूमिका, नियोजन आणि आयोजनाची जबाबदारी सांभाळल्याने 'विद्यार्थ्यांमध्येच भविष्यातील शिक्षक दडलेला आहे' हा प्रेरणादायी संदेश या कार्यक्रमातून मिळाला.

---

## पवित्र पोर्टल शिक्षक भरतीत शेकडो उमेदवार कागदपत्र पडताळणीला गैरहजर

### रिक्त झालेल्या जागांवर तातडीने Conversion Round घ्या किंवा 'Opting Out'ची सुविधा द्या

जन सम्राट टाईम्स

**नागपूर । प्रतिनिधी:** पवित्र पोर्टल शिक्षक भरती २०२५ अंतर्गत सुरू असलेल्या 'विना मुलाखत' पदभरती प्रक्रियेत उमेदवारांच्या गैरहजेरीचा गंभीर प्रकार समोर आला आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये पहिल्या फेरीच्या निवड यादीत नाव आल्यानंतरही शेकडो उमेदवार कागदपत्र पडताळणीसाठी (DV) गैरहजर राहिल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यामुळे अनेक जागा रिक्त राहून पात्र आणि गरजू उमेदवारांना मोठा फटका बसला आहे. निवड यादीत नाव आल्यानंतर कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित न राहून जागा रिक्त ठेवणाऱ्या उमेदवारांवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि




अशा उमेदवारांना TAIT-3 च्या पुढील प्रक्रियेत सहभागी होण्यास पूर्णपणे प्रतिबंधित करावे, अशी आक्रमक मागणी कृती समिती, महाराष्ट्र राज्य यांनी केली आहे. विविध जिल्ह्यांतील गैरहजेरीची धक्कादायक आकडेवारी प्राथमिक माहितीनुसार काही जिल्ह्यांमध्ये कागदपत्र पडताळणीसाठी उमेदवार गैरहजर राहिल्याने खालीलप्रमाणे जागा रिक्त राहिल्या आहेत—

| | | | |
|---|---|---|---|
| पालघर | — | ४६ | जागा |
| सातारा | — | ३५ | जागा |
| कोल्हापूर | — | ३३ | जागा |
| चंद्रपूर | — | २८ | जागा |
| गडचिरोली | — | २२ | जागा |
| सिंधुदुर्ग | — | २२ | जागा |
| सोलापूर | — | १६ | जागा |

केवळ या काही जिल्ह्यांचा विचार केला तरी २०० हून अधिक जागा उमेदवारांच्या गैरहजेरीमुळे रिक्त राहिल्याचे चित्र आहे. संपूर्ण राज्यातील आकडा यापेक्षा मोठा असण्याची शक्यता आहे. जागा अडवून ठेवणाऱ्यांमुळे गरजू उमेदवारांचे नुकसान शिक्षक भरतीसाठी अनेक वर्षांपासून हजारो बेरोजगार आणि पात्र उमेदवार प्रतीक्षेत आहेत. अशा परिस्थितीत पवित्र पोर्टलवर पसंतीक्रम भरून निवड झाल्यानंतरही काही उमेदवार कागदपत्र पडताळणीला गैरहजर राहिल्याने त्यांच्या नावावर असलेल्या जागा रिक्त राहिल्या आहेत. काही उमेदवारांनी इतरत्र नोकरी स्वीकारलेली असतानाही पवित्र पोर्टलवर पसंतीक्रम कायम ठेवला किंवा निवड झाल्यानंतर पुढील प्रक्रियेत सहभाग घेतला नाही, असा आरोप कृती समितीने केला आहे.

याचा थेट परिणाम अशा उमेदवारांवर झाला आहे, जे गुणवत्तेत असूनही केवळ काही गुणांनी निवड यादीच्या बाहेर राहिले. रिक्त झालेल्या जागा तातडीने पुढील पात्र उमेदवारांना उपलब्ध करून दिल्या असत्या तर अनेक उमेदवारांना शिक्षक म्हणून संधी मिळू शकली असती. 'TAIT-3' मधून कायमस्वरूपी प्रतिबंधाची मागणी कृती समितीने शिक्षण विभागाकडे मागणी केली आहे की, निवड झाल्यानंतरही कागदपत्र पडताळणीला जाणीवपूर्वक गैरहजर राहून इतर उमेदवारांचे नुकसान करणाऱ्या उमेदवारांवर कठोर निर्णय घ्यावा. अशा उमेदवारांना TAIT-3 च्या पुढील भरती प्रक्रियेत सहभागी होण्यास प्रतिबंधित करण्यात यावे, अशी मागणी समितीने केली आहे. मात्र, अशा कारवाईसाठी संबंधित भरतीच्या नियमांमध्ये स्पष्ट तरतूद आणि योग्य प्रशासकीय प्रक्रिया आवश्यक राहील, त्यामुळे शासनाने नियम तपासून याबाबत स्पष्ट निर्णय जाहीर करणे अपेक्षित आहे.